**यंत्रमाग सहकारी संस्थांच्या स्थापत्य बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक यंत्रमाग-२०१७/प्र.क्र.१६/टेक्स-२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २६ एप्रिल, २०१८

**वाचा:-** १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्रमांक यंत्रमाग-१०२०३/प्र.क्र.२/टेक्स-२, दिनांक ०८/०४/२००३.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्रमांक यंत्रमाग-२०१७/प्र.क्र.१६/टेक्स-२, दिनांक ०८/०३/२०१७.
३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१७/प्र.क्र. ६/टेक्स-५, दिनांक १५/०२/२०१८.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ अन्वये यंत्रमाग सहकारी संस्थांच्या यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामाच्या निविदा मंजूरीसाठी समित्यांची स्थापना करण्यात आलेली होती. परंतु आता वाचा क्रमांक ३ अन्वये जाहीर झालेल्या नविन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मधील परिच्छेद ७.३ मध्ये वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत येणाऱ्या योजनांचे प्रशासकिय सुलभीकरण करण्याच्या अनुषंगाने प्रशासकिय दृष्ट्या सोयीचे होण्याकरीता तथा वेळेचा अपव्यय टाळण्याकरीता यंत्रमागाचे बांधकामास व यंत्रसामुग्री खरेदीस मान्यता देणेबाबतच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात येईल असे नमुद करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन यंत्रमाग सहकारी संस्थांच्या स्थापत्य बांधकामाच्या व यंत्रसामुग्री खरेदीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयान्वये राज्यातील यंत्रमाग सहकारी संस्थांच्या स्थापत्य बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदीच्या निविदा प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार सुधारीत वित्तीय मर्यादेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. यंत्रसामुग्रीबाबत वित्तीय मर्यादा

| अ.क्र. | तपशील | दि. ०८.०४.२००३ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय मर्यादा | नविन वित्तीय मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | यंत्रमाग सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सहमतीने | - | रु.२.०० कोटी पर्यंत |
| २. | संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर | - | रु.२.०० कोटी ते रु.५.०० कोटी पर्यंत |
| ३. | सचिव (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखालील समिती | रु.१.०० कोटी पर्यंत | - |
| ४. | मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखालील समिती | रु.१.०० कोटीपेक्षा जास्त | रु.५.०० कोटी पेक्षा जास्त |

२. स्थापत्य बांधकाम विषयक वित्तीय मर्यादा

| अ.क्र. | तपशील | दि. ०८.०३.२०१७ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय मर्यादा | नविन वित्तीय मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | यंत्रमाग सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सहमतीने | - | रु.२.०० कोटी पर्यंत |
| २. | संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर | - | रु.२.०० कोटी ते रु.५.०० कोटी पर्यंत |
| ३. | सचिव (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखालील समिती | रु.५०.०० लाखा पर्यंत | - |
| ४. | मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखालील समिती | रु.५०.०० लाखा पेक्षा जास्त | रु.५.०० कोटी पेक्षा जास्त |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२६१५१७३३९४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd, serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2018.04.26 15:21:30 +05'30'

**( गौरी रा. म्हस्के )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरीषद, विधानमंडळ, मुंबई.
६. महालेखापाल, ( लेखापरीक्षा ) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
८. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.

१२. कार्यासन अधिकारी, (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई. (४ प्रतिंसह)
१३. अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन अधिकारी (१६-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.
१५. वित्त विभाग, व्यय २/अर्थसंकल्प १३, मंत्रालय, मुंबई.
१६.नियोजन विभाग, कार्यासन १४३१, मंत्रालय, मुंबई.
१७. प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), नागपूर/मुंबई/सोलापूर/औरंगाबाद.
१८. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
१९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२२. निवड नस्ती (टेक्स-२)